# सुखकर्ता दुःखहर्ता

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची।।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।।
सर्वांगी सुंदर उटी सेंदुराची।।
कंठी झळके माळ मुक्ताफळाची।।१।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती।।
दर्शनमात्रे मनःकामना पुरती।।धु.।।

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा।।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा।।
रुणझुणती नूपुरें चरणी घागरिया।।जय.।।२।।

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना।।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना।।
दास रामाचा वाट पाहे सदना।।
संकष्टी पावावे निर्वाणी रक्षावें सुरवर वंदना।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती।। दर्शनमात्रे. ।।३।।

अवंतिका
सोमवार ते शुक्रवार
रात्री ८.३० वाजता
MARATHI

Scanned by CamScanner

# शेंदूर लाल चढायो

शेंदूर लाल चढायो अच्छा गजमुखको ॥
दोंदिल लाल बिराजे सुत गौरीहरको ॥
हाथ लिये गुडलड्डू सांई सुरवरको ॥
महिमा कहे न जाय लागत हूं-पदको ॥१॥
जय जय जी गणराज विद्यासुखदाता ॥
धन्य तुमारा दर्शन मेरा मन रमता ॥धृ.॥

अष्टौ सिद्धी दासी संकटको बैरी ॥
बिघ्नबिनाशन मंगलमूरत अधिकारी ॥
कोटीसुरजप्रकाश ऐसी छबी तेरी ॥
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबहारी ॥जय.॥२॥

भावभगतसे कोई शरणागत आवे ॥
संतत संपत सबही भरपूर पावे ॥
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ॥
गोसावीनंदन निशिदिन गुण गावे ॥जय.॥३॥

Scanned by CamScanner

# लवथवती विक्राळा

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ॥
विषें कंठी काळा त्रिनेत्री ज्वाळा ॥
लावण्यसुंदर मस्तकी बाळा ॥
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ॥१॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा ॥
आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा॥धृ.॥

कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा ॥
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभूतीचे उधळण शितिकंठ नीळा ॥
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥जय.॥२॥

देवी दैत्यी सागरमंथन पै केले ॥
त्यामाजी अवचित हाळाहळ उठिलें॥
तें त्वां असुरपणें प्राशन केलें ॥
नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥जय. ॥३॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ॥
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी ॥
रघुकुळटिळक रामदासा अंतरी ॥ जय.॥४॥

सोमवार ते शुक्रवार
रात्री ८ वाजता

Scanned by CamScanner

# दुर्गे दुर्घट भारी

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ||
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ||
वारी वारी जन्ममरणातें वारीं ||
हारी पडलों आतां संकट निवारी ||१||
जय देवी जय देवी महिषासुरमर्दिनी ||
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ||जय.||धु.||

त्रिभुवनभुवनी पाहतां तुज ऐसी नाही ||
चारी श्रमलें परंतु न बोलवे कांही ||
साही विवाद करितां पडिले प्रवाही ||
ते तूं भक्तांलागी पावसि लवलाही ||जय.||२||

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा ||
क्लेशापासुनी सोडीं तोडीं भवपाशा ||
अंबे तुजवांचून कोण पुरवील आशा ||
नरहरि तल्लिन झाला पदकपंज लेशा||जय.||३||

मोघा
मंगळवार रात्री
९.३० वाजता

Scanned by CamScanner

# श्री दत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा।
नेति नेति शब्दें न ये अनुमाना।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥१॥
जय देव जय देव श्रीगुरुदत्ता।
आरती ओवाळितां हरली भवचिंता ॥धृ॥

सबाह्य अभ्यंकरी तूं एक दत्त।
अभ्याग्यासी कैंची कळेल ही मात॥
पराही परतली तेथे कैच हेत।
जनमरणाचा पुरलासे अंत॥ जय. ॥२॥

दत्त येऊनिया उभा ठाकला।
भावें साष्टांगेसीं प्रणिपात केला॥
प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला।
जन्ममरणाचा फेरा चुकविला॥ जय. ॥३॥

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान।
हारपले मन झालें उन्मन॥
मीतूंपणाची झाली बोळवण।
एक जनार्दनी श्रीदत्तध्यान॥ जय देव जय देव ॥४॥

Scanned by CamScanner

# आरती विठ्ठलाची

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा।।
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ।।१।।

जय देव जय देव जय पांडुरंगा।।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा
पावें जिवलगा।। जय. ।।धृ।।

तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं।।
कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं।।
देव सुरवर नित्य येती भेटी।।
गरुड हनुमंत पुढें उभे राहती।। जय. ।।२।।

धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा।।
सुवर्णाची कमळें वनमाळा गळां।।
राई रखुमाबाई राणीया सकळा।।
ओंवाळीती राजा विठोबा सांवळा।। जय. ।।३।।

Scanned by CamScanner



ओंवाळू आरत्या कुरवंड्या येती।।
चंद्रभागेमाजी सोडुनियां देती।।
दिंड्या पताका वैष्णव नाचती।।
पंढरीचा महिमा वर्णावा किती।। जय. ।।४।।

आषाढी कार्तिकी भक्तजन येती।।
चंद्रभागेमाजी स्नानें जे करिती।।
दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती।।
केशवासी नामदेव भावें ओंवाळिती।। जय. ।।५।।

Scanned by CamScanner

# आरती विठ्ठलाची

येई हो विठ्ठले माझे माउलीये।।
निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहें ।।धृ।।

आलिया गेलिया हाती धाडीं निरोप।।
पंढरपुरीं आहे माझा मायबाप।। येई. ।।१।।

पिवळा पितांबर कैसा गगनीं झळकला।।
गरुडावरी बैसुन माझा कैवारी आला।। येई. ।।२।।

विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी।।
विष्णुदास नामा जीवें भावें ओंवाळी।। येई. ।।३।।

Scanned by CamScanner

# श्री ज्ञानदेवाची आरती

आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥ आरती. ॥ धृ ॥

लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥ १ ॥

कनकाचे ताट करीं । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबर हो । साम गायन करी ॥ २ ॥

प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ।
रामजनार्दनीं । पायी मस्तक ठेविलें ॥ ३ ॥

Scanned by CamScanner

# प्रार्थना

घालीन लोटांगण वंदीन चरण,
डोळ्यांनि पाहिन रूप तुझें।।
प्रेमें आलिंगिन आनंदे पूजिन,
भावें ओंवाळिन म्हणे नामा ।।१।।

त्वमेव माताच पिता त्वमेव,
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव।।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव,
त्वमेव सर्वं मम देवदेव ।।२।।

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा,
बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्।।
करोमि यद्यम् सकलं परस्मै,
नारायणायेति समर्पयामि ।।३।।

अच्युतं केशवं रामनारायणं
कृष्णदामोदरं वासुदेवं हरे।।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं
जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।४।।

हरे राम हरे राम राम राम हरे हरे।।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।५।।

सोमवार ते शुक्रवार
रात्री ९ वाजता

Scanned by CamScanner